MHRT020010652022

**दिवाणी किरकोळ अर्ज क्र.२७०/२०२२**

**निशाणी क्र.१ वरील आदेश**

**१.** प्रस्तुतचा अर्ज अर्जदार यांनी बॉम्बे रेग्युलेशन अक्ट १८२७ चे चॅप्टरचे कलम २ प्रमाणे वारस दाखला (Heirship Certificate) मिळणेकरीता दाखल केला आहे.

**२.** अर्जदारांचे थोडक्यात कथन असे की, अर्जदार क्र.१ यांचे पती व अर्जदार क्र.२ ते ६ यांचे वडील कै.जगन्नाथ् महादेव आयरे यांचे नावे रत्नागिरी नगर परिषद हद्दीतील मौजे अशोक नगर, परटवणे, ता.जि.रत्नागिरी येथील नवीन मालमत्ता क्र.Z3W4000141 (जुना मालमत्ता क्र.२२६३/क) असा इमला आहे. कै.जगन्नाथ महादेव आयरे यांचा मृत्यु दि.२८/०३/२००१ रोजी झालेला आहे. अर्जदार क्र.१ यांनी सदरहु इमल्याच्या नावात बदल करणेसाठी अर्ज केला असता रत्नागिरी नगर परिषद कार्यालय, रत्नागिरीचे मुख्याधिकारी यांनी दि.०६/०९/२०१८ रोजी पत्र दिले व वारस दाखला आवश्यक असल्याचे कळविले आहे. त्यामुळे कै.जगन्नाथ महादेव आयरे यांचे मृत्यु पश्चात अर्जदार क्र.१ ते ६ हेच त्यांचे कायदेशीर वारस आहेत.

**३.** अर्जदार यांनी पुढे असे कथन केले की, कै.जगन्नाथ महादेव आयरे यांना अर्जदार क्र.१ ते ६ यांचे व्यतिरिक्त अन्य कोणीही कायदेशिर वारस नाहीत. त्यामुळे अर्जदार क्र.१ ते ६ यांनी कै.जगन्नाथ महादेव आयरे यांचे कायदेशिर वारस असल्याबाबतचा दाखला मिळावा याकरिता प्रस्तुतचा अर्ज दाखल केलेला आहे.

**४.** अर्जदार यांनी याकामी अर्जाचे पुष्ट्यर्थ निशाणी क्र.२ येथे अर्जदार क्र.१ यांचे प्रतिज्ञापत्र दाखल केले आहे. अर्जदार क्र.१ यांनी आपले सरतपासाचे प्रतिज्ञापत्र निशाणी क्र.१२ येथे दाखल केले आहे. अर्जदार यांनी निशाणी क्र.२३ कडे प्रस्तुत अर्जाच्या कामी अधिक पुरावा द्यावयाचा नसल्याची पुरशिस दाखल केलेली आहे.

**५.** अर्जदार क्र.१ ते ६ यांनी ते कै.जगन्नाथ महादेव आयरे यांचे वारस असल्याचे सिद्ध करणेकरीता खालीलप्रमाणे कागदोपत्री पुरावा न्यायालयात दाखल केलेला आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | अर्जदार यांना रत्नागिरी नगर परिषद कार्यालय रत्नागिरीचे मुख्याधिकारी यांनी दिलेले दि.०६/०९/२०१८ रोजीचे पत्र | | निशाणी क्र.१४ |
| २. | कै.जगन्नाथ महादेव आयरे यांचा मृत्यु दाखला. | | निशाणी क्र.१५ |
| ३. | गांव मौजे परटवणे, ता.जि.रत्नागिरी येथील म्यु.पल इमला क्र.२२६३/क च्या घरपट्टीचा उतारा सन २०२२–२३. | | निशाणी क्र.१६ |
| ४. | अर्जदार क्र.१ यांचे आधारकार्डाची सत्यप्रत | | निशाणी क्र.१७ |
| ५. | अर्जदार क्र.२ यांचे आधारकार्डाची सत्यप्रत | | निशाणी क्र.१८ |
| ६. | अर्जदार क्र.३ यांचे आधारकार्डाची सत्यप्रत | | निशाणी क्र.१९ |
| ७. | अर्जदार क्र.४ यांचे आधारकार्डाची सत्यप्रत | | निशाणी क्र.२० |
| ८. | अर्जदार क्र.५ यांचे आधारकार्डाची सत्यप्रत | | निशाणी क्र.२१ |
| ९. | अर्जदार क्र.६ यांचे आधारकार्डाची सत्यप्रत | | निशाणी क्र.२२ |
| १०. | दि.२२/११/२०२२ रोजी जाहीर नोटीस प्रसिद्ध केलेबाबतची 'दै. प्रहार' रत्नागिरी आवृत्तीची प्रत | | निशाणी क्र.११ |

**६.** बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ मधील तरतुदी अंतर्गत, मृत्यू पावलेल्या इसमाचे वारस, वारस प्रमाणपत्रासाठी अर्ज दाखल करु शकतो. असा अर्ज दाखल केल्यानंतर, त्यास कोणाची हरकत असल्याबद्दलचा जाहीरनामा दैनिक वृत्तपत्रामध्ये आणि मयत इसम ज्या ठिकाणी रहातो त्याठिकाणी प्रसिद्ध करणे बंधनकारक आहे. प्रस्तुत अर्जामध्ये सर्व तरतुदींची पुर्तता करण्यात आलेली आहे. तसेच याकामी जिल्हाधिकारी व जिल्हादंडाधिकारी कार्यालय, रत्नागिरी व तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी रत्नागिरी यांचे कार्यालयाच्या नोटीस बोर्डवर जाहीरनामा प्रसिध्द करण्यात आला. अर्जदारांनी दाखल केलेल्या अर्जास हरकत घेणेसाठी कोणीही न्यायालयाकडे आलेले नाही. जाहीरनाम्यास (निशाणी क्र.७) तसेच जाहीर पेपर नोटीस (नि.११) यांस आजतागायत कोणीही कोणतीही

हरकत नोंदविलेली नाही. उपरोक्त परिस्थितीनुसार व कायद्यातील तरतुदींची पहाणी करता कै.जगन्नाथ महादेव आयरे यांचे वारस म्हणून अर्जदार क्र.१ ते ६ यांना वारस प्रमाणपत्र मिळणेस अर्जदार हे पात्र ठरलेले आहेत. या परिस्थितीत खालील आदेश पारित करण्यात येतो.

**- आदेश -**

१. अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. अर्जदार क्र.१ स्नेहांकिता जगन्नाथ आयरे, अर्जदार क्र.२ मेघा जगन्नाथ आयरे, अर्जदार क्र.३ प्रणाली जगन्नाथ आयरे, अर्जदार क्र.४ अनघा अंकुश खरवतेकर पुर्वाश्रमीची सुषमा जगन्नाथ आयरे, अर्जदार क्र.५ ऋतुजा अमेय दांडेकर पुर्वाश्रमीची सरोज जगन्नाथ आयरे, अर्जदार क्र.६ समृध्दी विनोद कांबळे पुर्वाश्रमीची सपना जगन्नाथ आयरे यांना कै.जगन्नाथ महादेव आयरे यांचे वारस म्हणून घोषीत करण्यात येत आहे.

३. अर्जदार क्र.१ स्नेहांकिता जगन्नाथ आयरे, अर्जदार क्र.२ मेघा जगन्नाथ आयरे, अर्जदार क्र.३ प्रणाली जगन्नाथ आयरे, अर्जदार क्र.४ अनघा अंकुश खरवतेकर पुर्वाश्रमीची सुषमा जगन्नाथ आयरे, अर्जदार क्र.५ ऋतुजा अमेय दांडेकर पुर्वाश्रमीची सरोज जगन्नाथ आयरे, अर्जदार क्र.६ समृध्दी विनोद कांबळे पुर्वाश्रमीची सपना जगन्नाथ आयरे यांना कै.जगन्नाथ महादेव आयरे यांचे वारस म्हणून त्यांच्या नावे वारस प्रमाणपत्र देण्यात यावे.

४. अर्जदार यांनी दिवाणी नियमावलीचे परिच्छेद ३१२ मधील तरतुदीप्रमाणे कै. प्रमोद गोविंद पवार यांचे नावावरील सर्व मालमत्तांची यादी दाखल करावी.

**रत्नागिरी.**
**दिनांकः– २७/१२/२०२२**

**(पी. एस. गोवेकर)**
**२ रे सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर,**
**रत्नागिरी.**

**C E R T I F I C A T E** :-

I affirm that the contents of this pdf file Order are same word as per original Order.

| | | |
|---|---|---|
| Case No. | : | Civil M.A. No.229/2022 |
| Name of Stenographer | : | Mrs. M. N. Patil |
| Court Name | : | 2nd Jt. Civil Judge, (J.D.) & J.M.F.C., Ratnagiri. |
| Date of Decision | : | 27/12/2022 |
| Order signed by Presiding Officer on | : | 27/12/2022 |
| Order Digital signed by Presiding Officer on | | 27/12/2022 |
| Uploading date | : | 27/12/2022 |